डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.
**अर्थ प्रशासण विभाग,**
पी. ओ. कृषी नगर, अकोला - ४४४१०४ (महाराष्ट्र)
नियंत्रक
ई -मेल: comptroller@pdkv.ac.in

---

जा.क्र./अप्रवि/ई.केवासी/ ३४९/२०२६ दिनांक: २५/०५/२०२६

वाचा:- १. महाराष्ट्र शासन वित विभाग शासन परिपत्रक कमांक सकीर्ण-२०२२/प्र.क.२९/कोषा प्रशा-४ दिनांक २७ मार्च, २०२६
२. महाराष्ट्र शासन वित विभाग शासन परिपत्रक कमांक सकीर्ण-२०२२/प्र.क.२९/कोषा प्रशा-४ दिनांक २३ एप्रिल, २०२६

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक कमांक अप्रवि/ई-केवायी/सेवार्थ/२०२६ दिनांक १६.०४.२०२६

# परिपत्रक

सर्व आहरण व सवितरण अधिकारी, यांना कळविण्यात येते की, वरिल संदर्भीय परिपत्रकानुसार आपणास आपले कार्यालयाचे अधिनिस्त असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन घेत असलेले बॅक खाते चे ई-केवायसी पुर्ण करणे करीता, संबधित अधिकारी/कर्मचारी यांना आपले स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे असे अवगत करण्यात आलेले आहे.

सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे, माहे मे २०२६ देय जुन २०२६ चे वेतन देयका सोबत सदर प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा त्यांचे वेतन अदा केले जाणार नाही अशा सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. परंतु कार्यालयाचे असे निर्दशनास येते की, अद्याप पर्यत काही अधिकारी/कर्मचारी यांचे ई-केवायसी झालेले नाहीत किंवा संबधीत आहरण व सवितरण अधिकारी यांनी संबधित वेतन व लेखाधिकारी, अकोला / नागपुर यांचेकडे हार्ड कॉपी देयक व त्यासोबत ई-केवायसी प्रमाणपत्र सादर केलेली नाहीत त्यामुळे त्या कार्यालयाचे वेतन देयके अद्याप पर्यत सेवार्थ प्रणाली मध्ये वेतन व लेखाधिकारी अकोला/ नागपुर यांनी नियंत्रक यांचे कडे पाठविलेली नाहीत. अशा कार्यालयाचे अथवा संबधित अधिकारी/ कर्मचारी वेतन अदा केली जाणार नाहीत. याची सर्वस्वी जबाबदारी आपले कार्यालयाची व संबधित अधिकारी/कर्मचारी याची राहील याची नोंद घ्यावी.

नियंत्रक,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी,
०१. मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांना माहिती करीता सादर.
०२. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहायक यांना कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.
०३. विभाग प्रमुख, संगणक कक्ष यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापपीठाचे संकेतस्थळावर प्रसीध्द करावे.
०४. सर्व आहरण व सवितरण अधिकारी, यांना पुढील कार्यवाही करीता........
०५. वेतन व लेखाधिकारी, अकोला / नागपुर यांना सुचित करण्यात येते की, आपले कार्यालयाकडे प्राप्त झालेली मुळ वेतन देयके पडताळणी करणे ही आपली जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. विना ई-केवायसी वेतन देयके पारित करु नये. करीता आपण आपले स्तरावर पतडताणी करुनच देयके सेवार्थ प्रणाली मध्ये नियंत्रक यांचे कडे पाठविण्यात यावे. तसेच सेवार्थ प्रणाली मध्ये सादर केलेली देयके ई- केवायसी पुर्ण करण्यात आलेली आहे. अशी कार्यालयाचे नाव नमुद करुन प्रमाणपत्र सादर करावे.

नियंत्रक,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला